International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.1 Sept – Oct 2021

# पेशवेकालीन खानदेशातील चलन व्यवस्था

**बाबासाहेब दुधभाते**
इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**गोषवारा**

चलन हे आर्थिक इतिहासाचं महत्त्वाचे साधन आहे. आर्थिक इतिहास लेखनात नाणी हे महत्त्वपूर्ण साहाय्यकारी अस्सल पुरावे ठरतात. तसेच राजाच्या दृष्टीने चलनाचे महत्त्व अन्यसाधारण आहे. आपण चलनांचा अभ्यास कशासाठी करतो तर त्या अभ्यासातून चलन हे राज्य व सरकार यांची समृद्धता व आर्थिक स्थिती समजून घेण्यास मदत होते. चलन हे त्या राज्यातील जनतेचा महत्त्वाचा अधिकार असून त्यातून राज्याची सार्वभौमत्त्वात समजते तसेच त्यातून राज्याची कायदेशीरपणा समजण्यास मदत होते.

**प्रस्तावना**

खानदेशामध्ये चलनांच्या संदर्भात मोठी चमत्कारिक परिस्थिती होती. येथे शेकडो तऱ्हेची नाणी अस्तित्वात व व्यवहारात होती. ती केवळ खानदेशमध्येच पाडलेली होती असे नव्हे तर मराठा राज्याच्या इतरही भागातून अनेक नाणी येत असल्यामुळे सर्वांचा सुसंगत अभ्यास करणे कठिण आहे. १

चलन व्यवस्थेच्या सोयीसाठी मराठाकालीन चलनाचे दोन भाग पडतात. पहिला म्हणजे शिवकाळ (१६३० ते १७०७). दुसरा म्हणजे पेशवेकाळ हा इ. स. १७०७ ते १८१८ असा मानला जातो. कारण १६७४ पासून निर्विवाद पणे मराठा राज्यप्रणित नानी पाडण्यास सुरूवात झालेली दिसते.२

खानदेश जेव्हा १८१८ ला ब्रिटीशांनी ताब्यात घेतला तेव्हा त्यांना असे आढळून आले आहे की विविध प्रकारची नाणी बाजारात होती. ब्रिटिशांच्या सुरूवातीच्या काळात खानदेशात नाण्यांच्या बाबतीत विविधता दिसून येते. मात्र ही हळूहळू नाहीशी झाली. आणि व्यवहारात एकच नाणे अस्तित्वात होते आणि ते म्हणजे चांदवडी रूपया. पेशवे काळापासून ब्रिटिशकाळापर्यत एकच नाणे चलनात होते ते म्हणजे चांदवाडी रूपया होता असे खानदेशचा पहिला कलेक्टर जॉन ब्रिगजन म्हटले आहे. ३

ग. ह. खरे या प्रसिद्ध इतिहास संशोधकाने 'मंडळातील नाणी' हा ग्रंथ १९३३ मध्ये लिहला असून त्यात मराठीकालीन नाण्यांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज व उत्तरकालीन मराठे यांच्यामध्ये नाण्यांच्या बाबतीत एक महत्त्वाचा फरक दिसतो. शिवाजी महाराजानी स्वतंत्र राज्य स्थापण केले व स्वतंत्र नाणी पाडली. पेशवे आणि इतर मराठा सरदारांनी मराठयांचे राज्य संबंध हिंदूस्थानभर करण्याची उमेद धरली पण त्यांनी स्वतःचे नाणे असावी असे कधी वाटले नाही. उलट मोगल बादशाहाचे सार्वभौमत्त्व मानण्यांत पेशवे व इतर मराठा सरदार भूषण समजत होते की काय अशी शंका येते. शिवाय त्यामुळेच पेशवे व शिंदे होळकर, भोसले, सरदार हे एकाच मराठी राज्याचे घटक होते हे समजून येईल असे चिन्ह यापैकी एकाच्याही

नाण्यांवर आढळून येत नाही. वरील बहुतेकांनी आपल्या कुलदेवतचे नाव किंवा कुलांचे चिन्ह यापैकी काहीतरी एक आणि शाह आलम किंवा इतर मोगली बादशाह यांची नावे नाण्यांवर घतली आहे. ४

७ डॉ. के. एन. चिटणीस यांच्या मते पेशव्यांच्या काळातील नाण्यांचा इतिहास म्हणजे एकंदरीत नाणे पद्धतीच्या ऱ्हासाचा इतिहास होय. त्यांच प्रमाणे तो भेसळीचा व अधोगतीचा इतिहास होता. या काळात चलन व्यवस्थतेतील गोंधळ अधिक वाढून संभ्रम निर्माण करणारा होता. ५

पेशवेकाळात खाजगी व्यक्तीला नाणी पाडण्याचे परवाने देण्याचे प्रमाण अधिकच वाढले. बेकादेशीर पणे नाणे पाडणे सुरू झाले. कायदेशीर व बेकायदेशीर अशा दोन्ही प्रकारचा टाकसाळीतून प्रमाणभूत नाणी न पाडता त्यात फरक होऊ लागला. यावेळी अशुद्ध व कमी दर्जाची नाणी तयार होऊ लागली. डॉ. चिटणीस यांच्या मतानुसार पेशवे सरकार टांकसाळीतून चालणाऱ्या गैर व्यवहारांना आळा घालण्याचा प्रयत्न करून सुद्धा टांकसळीवर म्हणावे तितके नियंत्रण राखू शकले नाहीत

मराठा राज्यात अनेक टांकसाळी होत्या त्यात सरकारी व खाजगी टांकसाळ असत. पेशव्यांच्या टांकसळीत मोहरा (सोने) रूपये, चांदीची नाणी पण पाडली जात. चांदवड येथे मल्हारराव होळकरांनी बादशाहाकडून जहागीरी मिळवूण तेथे वसाहत करून एक टांकसाळ टाकली. १००० रूपये पाडण्यासाठी २१ रूपये कमिशन असे पुढे १९३० मध्ये ही टांकसाळ ब्रिटीशांनी बंद केली

खानदेशमध्ये चांदवाडी रूपया प्रसिद्ध होता. त्यांच बरोबर खानदेशांत तांब्यांची नाणी, चांदीची नाणी, सोन्यांची नाणी, शिवराई, आलमगिरी, ढवबु पैसा, इ. तांब्याची नाणी प्रचलित होती. खानदेशांत चांदवाड, माहुली, नसिफ, पुणे, चिंचवड, धारवड, बुऱ्हाणपूर येथील टांकसाळीतील चलन चालत असे.

**सारांशः-**

पेशवे व इतर मराठा सरदारांनी स्वतःचे चलन काढले नव्हते, तसेच पेशवेकालीन चलनात समानता नव्हती. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श पेशवेकाळात राहिला नाही. इतिहासकार शेजवळकर यांच्यामते पेशव्यांनी उघडपणे मुघल सत्तेची सार्वभौमी सत्ता स्वीकारली होती.

**संदर्भ-**


१. शहा. जी.बी, मध्ययुगीन खानदेश- प्रशांत पब्लिकेशन जळगांव, २०२५. पृ. ३१३.
२. प्रभूणे पद्माकर, महाराष्ट्रातील चलनाच्या इतिहास, डायमंड पब्लिकेशन, पुणे-२००७, पृ. ११
३. पाटील स. गो. खानदेशातील व्यापार उद्योग, (१८१८-१८२६) अप्रकाशीत एम.फील लघुप्रबंध, पुणे विद्यापीठ, १९८५, पृ. १३०.
४. खरे ग.ह., मंडळातील नाणी, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे-१९३३, पृ. ७
५. चिटणीस के. एन. मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग - ४, पुणे-१९८५. पृ. ५२.
६. सं.गो. पाटील, पूर्वीक्त पृ. १३०.